# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/02/2024 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ३५,७५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २५/०२/२४ रोजी रात्री २०.४५ वा. दरम्यान पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफ अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर १८ चक्का एलपी ट्रक क्र. MH-40/CM-8522 हा येतांना दिसल्याने माथनी शिवारातील टोल नाक्यावर नाकाबंदी दरम्यान ट्रकला थांबवून पाहणी केली असता ट्रक क्र. MH-40/CM-8522 मध्ये अंदाजे १५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने ट्रक क्र. MH-40/CM-8522 किंमती ३५,००,०००/—रू. व त्यामधील १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/—रू. असा एकूण ३५,७५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून ट्रक चालक नामे **रामप्रसाद सुखाराम दसमेर वय ४१ वर्ष रा.सावंगी ता. रामटेक तसेच ट्रक मालक मिलिंद रमेश जैस्वाल रा. देवालापार** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१, खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार व पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतीशसिंह राजपूत, पो. हवा. संदीप कडु , पो. हवा. गणेश मुदमाळी, पो. हवा. रुपेश महादुले, पोहवा राजेंद्र गौतम पो.ना. दिपक दरोडे, पोलीस अंमलदार विकास मस्के यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर